









# नववर्ष स्वागतयात्रा आणि हिंदूंचे संघटन !




गुढी पाडवा या सणाला पौराणिक तसेच ऐतिहासिक संदर्भ आहे. गुढीपाडवा हाच सृष्टीचा आरंभ दिन आहे. शकांनी हुणांचा पराभव केला तो दिवस गुढीपाडव्याचा, म्हणूनच गुढीपाडव्यापासून शालिवाहन शक सुरु होते. हिंदू पंचांगाचा आरंभ दिन हा हिंदू नववर्षाचा पहिला सणसुद्धा आहे. श्रीरामादीकाळापासून हा सण उत्सहाने साजरा केला जात असल्याचे पुरावे सापडतात. आजही हा सण देशातील विविध भागांत विविध पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात या दिवसाचे स्वागत दारोदारी गुढ्या उभारून केले जाते. या दिवशी पारंपरिक वेशभूषा परिधान करून एकमेकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या जातात. हल्लीच्या पिढीवर सामाजिक माध्यमे, इंटरनेट यांचा प्रभाव अधिक असल्याने हल्ली शुभेच्छा प्रत्यक्ष भेटून देण्याऐवजी व्हाट्सअप आणि टेलिग्रामच्या माध्यमातून दिल्या जाऊ लागल्या आहेत. अनेक सामाजिक संस्था, मंडळे यांच्या कार्यालयांमध्ये या दिवशी श्री सत्यनारायणाच्या महापूजा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

दिवाळी पहाटच्या धर्तीवर हल्ली गुढीपाडवा पहाट कार्यक्रमांचेही काही ठिकाणी आयोजन केले जाऊ लागले आहे. मुंबई ठाणे, पुणेसह काही प्रमुख शहरांमध्ये या दिवशी नववर्ष स्वागतयात्रा काढल्या जातात. विविध सामाजिक संस्था, सांस्कृतिक मंडळे, संप्रदाय, संघटना यांचे प्रतिनिधी या स्वागतयात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. विविध मंगलवाद्यांसह ढोल ताशा पथकांचे संचलन या स्वागतयात्रांचे प्रमुख आकर्षण असते. काही ठिकाणी या यात्रांमध्ये समाज प्रबोधनात्मक देखावे सादर केले जातात, पारंपरिक खेळांची आणि शौर्य जागरणाची प्रात्यक्षिके यानिमित्ताने पाहायला मिळतात. ज्वलंत सामाजिक विषयावर भाष्य करणारे प्रबोधनात्मक फलक या स्वागतयात्रांचे प्रमुख वैशिष्ट्य असते. पारंपरिक दागिन्यांसह नऊवारी साडी परिधान करून दुचाकीस्वार तरुणी या स्वागतयात्रांची शोभा वाढवतात, स्वागतयात्रांच्या स्वागतार्थ यात्रामार्गावर ठिकठिकाणी सुबक रांगोळ्या काढल्या जातात, स्वागताचे फ्लेक्स लावले जातात, या स्वागतयात्रांचे अनेक ठिकाणी सवाष्ण स्त्रिया औक्षण करून स्वागत करतात तर काही ठिकाणी या स्वागतयात्रांवर पुष्पवर्षाव केला जातो. यानिमित्ताने सर्वत्रचे वातावरण भगवामय झालेले असते. स्वागतयात्रांच्या समारोपाच्या ठिकाणी काही वेळा मान्यवरांची भाषणे होतात. या भाषणांतून हिंदू संघटनांचे महत्व सांगितले जाते. भाषणे संपल्यावर सहभागी प्रत्येक जण आपापल्या मार्गाने मार्गस्थ होतो. गुढीपाडव्याच्या निमित्ताने काढण्यात येणाऱ्या स्वागतयात्रांमध्ये लोक आपली जात, पक्ष, संघटना विसरून एक हिंदू म्हणून सहभागी होतात. हिंदूंच्या संघटनशक्तीचे अभूतपूर्व दर्शन या स्वागतयात्रांतून घडते. खरेतर हे संघटन केवळ स्वागतयात्रांच्या निमित्ताने नव्हे तर ते कायमस्वरूपी दिसण्याची आवश्यकता आज निर्माण झाली आहे.

ज्या भारतभूमीत एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता, प्रत्येक खेडी स्वयंपूर्ण होती त्या भारतावर आज कोट्यवधी रुपयांचे कर्ज आहे. देशावर चालून आलेल्या यवनी आक्रमकांनी, इंग्रजांनी, पोर्तुगीजांनी या देशाचे सारे वैभव लुटले, तलवारीच्या जोरावर धर्मांतरे घडवून आणली, बाया बापड्यांच्या अब्रू लुटल्या, इथल्या नागरिकांवर अनन्वित अत्याचार केले. त्याकाळी असलेले राजे महाराजे शूरवीर आणि सामर्थ्यशाली होते; मात्र नागरिक जातीपातींत विभागले होते. हिंदूमधील याच फुटीचा लाभ इंग्रजांनी घेतला. फोडा आणि राज्य करा नीतीचा अवलंब केला. मूठभर इंग्रजांनी अवाढव्य हिंदुस्थानावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. जातीपातीत इंग्रजांनी निर्माण केलेली दरी स्वातंत्र्यानंतरही कायम ठेवण्याचे काम नंतरच्या राजकारणी मंडळींनी केले. आजही हे कार्य अविरतपणे सुरु आहे. राजकीय स्वार्थासाठी हिंदूमध्ये फूट पाडण्याचे, जातीपातीसाठी लढण्याचे ही मंडळी आपल्या भाषणांतून जणू प्रशिक्षणच देत असतात. हिंदूमध्ये असलेल्या ऐक्याच्या अभावामुळे आज कोणीही उठतो आणि हिंदूंच्या देवीदेवतांवर, श्रद्धास्थानांवर, साधू संतांवर अश्लाघ्य टीका करतो. हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल लावून हिणवले जाते. हिंदूंच्या वंश विच्छेदासाठी कार्यरत असलेले लव्ह जिहादचे संकट आज देशभर थैमान घालत आहे, ज्या माध्यमातून दरवर्षी हजारो हिंदू मुली बाटवल्या जात आहेत. यावर प्रखरपणे भाष्य करणारा दि केरला स्टोरी चित्रपट देशभर गाजला. यामध्ये दाखवण्यात आलेली उदाहरणे केवळ प्रातिनिधिक आहेत. देशभरातील प्रत्येक राज्यात, प्रत्येक तालुक्यांत अशा स्टोरी घडलेल्या आहेत आणि घडत आहेत. लॅण्ड जिहादच्या माध्यमातून हिंदूंच्या जागा बळकावल्या जात आहेत यासंदर्भात प्रबोधन करणारा दि काश्मीर फाईल चित्रपट आपण सर्वांनीच पहिला असेल. देशातील दुर्गम भागांत, आदिवासी पाड्यांत औषधी उपचार, दोन वेळचे जेवण देण्याच्या मोबदल्यात तेथील गरीब हिंदूंचे धर्मांतर केले जात आहे. देशात धर्मांतरण बंदीचा कायदा आणण्यासाठी अनेक वर्षांपासून मागणी केली जात आहे मात्र सरकार त्याकडे केवळ दुर्लक्ष करत आहे. देशभरात प्रसिद्ध असलेली जवळपास सर्वच मंदिरे आज शासनाच्या अखत्यारीत आहेत.

भाविकांनी या मंदिरांना श्रद्धेने दिलेल्या दानावर आज शासनाचा अंकुश आहे. भगवंताच्या चरणी अर्पण केलेल्या धनाचा वापर धर्मकार्यासाठी केला जायला हवा; मात्र या सरकार हा पैसा जलयुक्त शिवार, दुष्काळ निवारण, आंतरजातीय विवाह यांसारख्या शासकीय योजनांसाठी हवा तसा वापरते. सरकारी तिजोरीत पैसा संपल्याचे कारण देत मंदिरांच्या तिजोरीवर डल्ला मारला जातो. लहानपणापासून आपल्याला गाईच्या पोटात ३३ कोटी देवता असतात असे सांगितले गेल्यामुळे रस्त्यात येताजाता दिसणाऱ्या गाईच्या पोटाला हात लावून तो मस्तकाला लावण्याची सवय आपल्या अंगवळणी पडलेली आहे. हिंदूंना पूजनीय असलेल्या गाईच्या संरक्षणासाठी राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा तर करण्यात आला मात्र आजही प्रतिदिन मोठ्या प्रमाणात गोवंश कापला जात आहे. गोवंशाने भरलेल्या गाड्या कुठेनाकुठे पकडल्या गेल्याच्या बातम्या प्रतिदिन वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. मुक्त केलेल्या गोवंशांना जवळच्या गोशाळांमध्ये सोडले जाते. अशा हजारो गोशाळा आज राज्यात आहेत. सरकारी अनुदान केवळ मोजक्या गोशाळांना मिळते. अन्य गोशाळा सर्वस्वी गोप्रेमींच्या दानावर चालत आहेत. अपुऱ्या निधीमुळे अनेक गोशाळांना घरघर लागली आहे. दुष्काळी भागांत गोशाळांमध्ये चाऱ्याच्या अभावी गाई कुपोषणाने रुग्णाईत होत आहेत. हिंदूंनी मंदिरांत दिलेले दान सरकार गोवंश जगवण्यासाठी का वापरत नाही असा गंभीर प्रश्न गोप्रेमींना पडला आहे. अशा एकना अनेक समस्या आज हिंदूसमोर आ वासून उभ्या आहेत. या सर्व समस्यांचे निवारण केवळ हिंदूंच्या संघटनातुन होऊ शकते. 'संघे शक्ती कलौयुगे' हा कलियुगातील मूळमंत्र आहे. संघटनेत शक्ती असते. संकटांविरोधात लढण्याचे सामर्थ्य असते त्यामुळे हिंदूंनी केवळ नववर्ष स्वागतयात्रांच्या निमित्ताने एकजुटीचा अविष्कार घडवणे पुरेसे नाही तर हिंदूसमोरील प्रत्येक संकटासाठी आपली संघटनशक्ती दाखवण्याची वेळ आली आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**






































# छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा गुढीपाडव्याशी संबंध आहे का ?



हिंदवी स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांची हत्या क्रूरकर्मा औरंगजेबाने अत्यंत हाल हाल करून फाल्गुन अमावास्येच्या रात्री केली याविषयीचे सविस्तर दाखले इतिहासकारांनी त्यावेळीच मांडले आहेत. मागील महिन्यात प्रदर्शित झालेल्या छावा चित्रपटाने हा सत्य इतिहास जगासमोर मांडला. असे असताना काही जात्यंध शक्ती समाजात दुही माजवण्याच्या उद्देशाने गुढीपाडवा जवळ आला की संभाजी महाराजांची हत्या ब्राह्मणांनी मनुस्मृतीनुसार केल्याचा विखारी प्रचार करताना आढळतात.

सामाजिक माध्यमांतून तशा पोस्ट पसरवल्या जातात. ब्राह्मणद्वेषाची कावीळ झालेले हे महाभाग वर्षभर संभाजी महाराजांचे नावही घेत नाहीत; मात्र गुढीपाडवा जवळ आला की हा सण संभाजी महाराजांच्या हत्येप्रीत्यर्थ ब्राह्मणांनी साजरा करण्यास सुरुवात केल्याचे ढोल बडवून सांगू लागतात. रावणाचा वध करून प्रभू श्रीराम वनवासातून परतल्याच्या आनंद महाराष्ट्र प्रदेशात गुढ्या उभारून साजरा केल्याचा इतिहास आहे. आनंद साजरा करण्यासाठी महाराष्ट्रात पूर्वीपासून गुढ्या उभारत असल्याचा उल्लेख शिवकालीन इतिहासातच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वकाळातील उपलब्ध पत्रव्यवहारांतूनही, संतांच्या अभंगांतून, इतिहासकालीन दाखल्यातून आढळतो. इतिहासाचार्य वि.के.राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', या नावाने इतिहासाचे अनेक खंड प्रसिद्ध केले आहेत ज्यामध्ये इतिहासकालीन विविध पत्र आणि दस्तावेज संग्रहित आहेत. त्यातील एका पत्रात 'गुढी पाडवा' या सणाचा उल्लेख केलेला आपल्याला आढळतो. या पात्रात असा उल्लेख आहे कि 'गुढीपाडवा या सणानिमित्त निराजी पंडित आपल्या घरी आले होते.' हे पत्र नारायण शेणवी या मुंबईच्या वकिलाने मुंबईच्या गव्हर्नरला लिहिले आहे. हे निराजी पंडित म्हणजे शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील एक सदस्य होते आणि ते आपल्या घरी गुढीपाडव्यानिमित्त आल्याचा उल्लेख सापडतो. यावरून हे स्पष्ट होते कि शिवरायांच्या काळातही गुढीपाडवा सण साजरा केला जात असे.

आपल्या संतांनी देखील गुढीपाडव्याचा उल्लेख अनेक ओव्या आणि अभंग यांतून केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ४ ओवी क्रमांक ५२ मध्ये लिहितात 'अधर्माची अवधी तोडी। दोषांची लिहिली फाडी।सज्जनांकरवी गुढी। सुखाची उभवी।।' ज्ञानेश्वरीतील अध्याय क्रमांक ६ ओवी क्रमांक ५२ मध्ये पुढील ओळी आढळतात 'ऐके संन्यासी तोची योगी। ऐसी एकवाक्यतेची जगी। गुढी उभविली अनेगी। शास्त्रांतरी।।' तर अध्याय क्रमांक १४ ओवी क्रमांक ४१० मध्ये माऊली म्हणतात

**'माझी अवसरी ते फेडी।**
**विजयाची सांगे गुढी।**
**येरू जीवी म्हणे सांडी।**
**गोवी यिया।।'**

संत एकनाथ महाराज भागवतात श्रीराम चरित्र वर्णन करताना म्हणतात 'फेडावया देवाची साकडी। स्वधर्म वाढवावया वाढी। नामे मोक्षाची उभवावया गुढी। सूर्यवंशा गाढी दशा आली।।' पुढे श्रीकृष्ण चरित्रात ते म्हणतात, 'गुढीयेसी सांगू आले। कंस चाणुर मर्दिले।। हर्षे नाचताती भोजे। जिंकियेले यादवराजे।। गुढी आली वृंदावना। मथुरा दिली उग्रसेना।।झाला त्रिभुवनी उल्हास। लळीत गाये भानुदास।।' शिवकालीन खंडात होऊन केलेले जगद्गुरू संत तुकाराम महाराज गुढीचे वर्णन करताना म्हणतात 'ब्रह्मानंदे लोक सकळ नाचती।गुढीया उभविती घरोघरी।।' एके ठिकाणी महाराज लिहितात, 'गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा। बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्या नरनारी। गुढिया तोरणे करिती कथा गाती गाणे। तुका म्हणे छंदे येणे वेधिली गोविंदे।।' संत चोखामेळा यांचा पुढील अभंग तर सर्वश्रुत आहे, 'टाळी वाजवावी गुढी उभारावी। वाट ही चालावी पंढरीची ।।' यासंदर्भात संशोधनच करायचे म्हटले तर शेकडो पुरावे सापडतील, त्यामुळे छत्रपती संभाजी संभाजी महाराजांच्या हत्येचा संबंध गुढीपाडवा या प्राचीन सणाशी जोडण्याचा जात्यंध शक्तींचा अपप्रचार केवळ सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठीच असल्याचे स्पष्ट होते. क्रूरकर्मा औरंगजेब हा अत्यंत निष्ठुर आणि धर्मांध होता. छत्रपती संभाजी महाराजांना पकडून एक महिना त्याने महाराजांवर अनन्वित अत्याचार केले. धर्मांतरण करण्यास दबाव आणला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि आई जिजाऊंच्या संस्कारांतून मोठे झालेल्या शंभू राजांनी प्राण त्यागने पसंत केले मात्र हिंदू धर्म त्यागला नाही.

शंभूराजांची धर्मनिष्ठा औरंग्याच्या जिव्हारी खुपली. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा हिंदूंचा सर्वात मोठा सण. हिंदूचा नववर्षारंभ. हा सण हिंदूंनी साजरा करू नये म्हणूनच फाल्गुन अमावास्येला त्याने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली. त्याने ज्या उद्देशाने हा डाव साधला तोच डाव यशस्वी करण्याचा दुर्दैवी प्रयत्न आजची काही धर्मद्वेषी मंडळी करत आहेत. हल्ली गुढ्यांऐवजी घरांवर भगवे ध्वज उभारण्याचे आवाहन करणारे संदेशही सामाजिक माध्यमांतून पसरवले जाऊ लागले आहेत. भगवे ध्वज ही स्वराज्याची पताका तसेच हिंदू धर्माचे प्रतीक असल्याने घरावर अवश्य लावावेत; मात्र केवळ एक दिवसासाठी नव्हे, तर ते कायमस्वरूमी घरावर लावावेत. गुढीपाडव्याला मात्र हिंदू नववर्षाचे स्वागत शास्त्रोक्तरीत्या दारासमोर गुढी उभारूनच करावे.

**– सौ.मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई**

## महानगरपालिकांनाही प्लास्टिक फुलांच्या बाजारावर कारवाईचे अधिकार- मुख्यमंत्री

### प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, मुंबई :** राज्यात प्लास्टिक बंदी अस्तित्वात असली तरी बाजारपेठेत कृत्रिम (प्लास्टिक) फुलांचा वाढता वापर शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या व्यवसायावर परिणाम करत आहे. प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला.

तर सदस्य शशिकांत शिंदे, अमित गोरखे, अमोल मिटकरी, सदाभाऊ खोत, अनिल परब यांनी उपप्रश्न उपस्थित केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्लास्टिक बंदीच्या विद्यमान अधिसूचनेअंतर्गतच विशेष अधिसूचना काढून प्लास्टिक व कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्यात येईल. महानगरपालिकांना अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार असून, प्लास्टिक फुलांचा वापर करणाऱ्या डेकोरेशन व्यावसायिक, बँक्वेट हॉल्स आणि इतर संबंधित घटकांनाही नोटिस दिली जाईल. नियमांचे



उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. याबाबत अधिक माहिती देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल बंदी अधिसूचना २०१८ नुसार सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक आणि थर्माकोलवर पूर्णतः बंदी आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी सण - उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे. एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात येऊन १.५५ कोटी दंड वसूल करण्यात आला असून ६७.५४ मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

## माथेरानमध्ये स्वच्छ सुंदर अभियानाला सुरवात

### महिनाभर स्वच्छता मोहिमेची जोड...

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान :** रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर माथेरानमध्ये 'स्वच्छ, सुंदर माथेरान' अभियानाची सुरुवात झाली असून शहरात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या मोहिमेत सुमारे १०० कर्मचारी सहभागी झाले आहेत.यासोबतच बोहरा समाजाच्या वतीनेही महिनाभर स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली असून प्रत्येक प्रभागात साफसफाई केली जात आहे. या उपक्रमामुळे सुमारे १०० आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध झाला आहे.या मोहिमेत स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग असून 'पुन्हा स्वच्छ, पुन्हा हरित' हा संदेश दिला जात आहे. यापूर्वी महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या माध्यमातूनही मोठी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती.

दरम्यान, वखारी नाका ते कच कॅसल या रस्त्याची खराब अवस्था लक्षात घेता तो सुधारण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या उपक्रमांमुळे माथेरान अधिक स्वच्छ व पर्यटकांसाठी आकर्षक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## रायकर पाडा शाळेत बाल आनंद मेळावा रंगला !

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१८, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा रायकर पाडा येथे आज कौशल्य संपादन व बाल आनंद मेळाव्याचा रंगतदार कार्यक्रम पार पडला. या मेळाव्यात शाळेतील बालगोपालांनी विविध प्रकारचे आकर्षक स्टॉल उभारून आपली कौशल्ये सादर केली. खाद्यपदार्थ, खेळणी, हस्तकला वस्तू, तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्टॉल पाहण्यासाठी गावातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. चिमुकल्यांच्या कल्पकतेला आणि मेहनतीला ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद देत स्टॉलमधून खरेदी केली आणि आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाला गावातील पोलीस पाटील, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच अनेक ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास आणि उद्योजकतेची भावना वाढीस लागते, असे मत व्यक्त केले.

# गुढीपाडवा संपूर्ण सृष्टीसाठी शुभ,समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते. फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य. हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे. हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवासण साजरा करतो. आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते. गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात




केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला. मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे. अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो.

या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दु:ख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे.आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो.गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते.

गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो.परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने, आदरतीथ्याने, प्रेमाने,मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो. त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो. महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली,मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.


**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वृध्दाश्रम आणि कुटुंबसंस्कृती : एक वेदनादायी वास्तव

आज भारतात हजारो वृद्धाश्रम उभे राहिले आहेत. मोठ्या शहरांपासून ते लहान गावांपर्यंत अनेक ठिकाणी वृद्धाश्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसते. हे वृद्धाश्रम म्हणजे केवळ इमारती नाहीत; त्या आपल्या समाजाच्या बदलत्या मानसिकतेचे, तुटत चाललेल्या कुटुंबव्यवस्थेचे आणि नात्यांतील दुराव्याचे जिवंत प्रतीक आहेत. परंतु या वास्तवाकडे पाहताना एक प्रश्न अनेकदा समोर येतो की, देशात इतके वृद्धाश्रम असताना त्यामध्ये मुस्लिम समाजातील वृद्ध व्यक्ती फारच कमी का दिसतात? हा प्रश्न केवळ धर्माचा नाही, तर संस्कृती, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक मूल्यांचा विचार करण्यास भाग पाडणारा आहे. भारतीय संस्कृतीत 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही संकल्पना हजारो वर्षांपासून सांगितली जाते. आई-वडील हे देवतुल्य आहेत, त्यांची सेवा करणे हे कर्तव्य आहे, असा संस्कार आपल्या समाजात दिला जातो. तरीही आज वास्तव वेगळे दिसते. अनेक वृद्ध आई-वडील आपल्या मुलांच्या घरात नव्हे, तर वृद्धाश्रमात दिवस काढताना दिसतात. ज्यांनी आपल्या आयुष्याची संपूर्ण कमाई, श्रम आणि प्रेम मुलांच्या भविष्याकरिता अर्पण केले, त्यांनाच शेवटी परकेपणाची शिक्षा भोगावी लागते. हा विरोधाभास समाजाच्या मनाला अस्वस्थ करणारा आहे.

वृद्धाश्रमांमध्ये राहणाऱ्या अनेक वृद्धांच्या कथा ऐकल्या, तर मन हेलावून जाते. काहींची मुले परदेशात स्थायिक झालेली असतात, काहींना मुलांकडे वेळ नसतो, तर काहींना घरातच उपेक्षा आणि अपमान सहन करावा लागतो. त्यामुळे ते वृद्धाश्रमाचा पर्याय स्वीकारतात. काही वेळा ही निवड स्वेच्छेची नसते, तर परिस्थितीची जबरदस्ती असते. वृद्धाश्रम म्हणजे सुरक्षित आसरा असला, तरी त्यामागे दडलेली वेदना मात्र खोल असते, ती म्हणजे आपल्या लोकांनी दिलेली एकाकीपणाची शिक्षा. परंतु दुसरीकडे मुस्लिम समाजाकडे पाहिले, तर अनेकदा असे दिसते की वृद्ध आई-वडील कुटुंबातच राहतात. संयुक्त कुटुंबाची परंपरा, धार्मिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यामुळे वृद्धांची जबाबदारी ही कुटुंबाचीच मानली जाते.

इस्लाम धर्मात पालकांची सेवा ही अत्यंत पवित्र कर्तव्य मानली जाते. कुरआनमध्येही आई-वडिलांच्या सेवेला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर ठेवणे हे सामाजिकदृष्ट्या नाकारलेले वर्तन मानले जाते. ही गोष्ट केवळ धार्मिक शिकवणीची नाही, तर संस्कारांची आहे.




मात्र याचा अर्थ असा नाही की एका समाजात सर्व काही आदर्श आहे आणि दुसऱ्यात सर्व काही चुकीचे आहे. बदलत्या काळात प्रत्येक समाजासमोर आव्हाने उभी आहेत.

शहरांमध्ये वाढती स्थलांतराची प्रक्रिया, नोकरीच्या बदलत्या पद्धती, लहान होत चाललेली कुटुंबव्यवस्था आणि वाढती स्पर्धा यामुळे नात्यांवरही परिणाम होत आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये आई-वडिलांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. त्यामुळे वृद्धाश्रमांची गरज निर्माण झाली आहे. पण येथे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो की, आपण विकासाच्या नावाखाली नात्यांचे मूल्य विसरत आहोत का? आधुनिकतेच्या प्रवाहात आपण कुटुंबव्यवस्थेचा पाया दुर्बल करत आहोत का? भौतिक सुखसुविधा वाढल्या असल्या, तरी भावनिक जवळीक कमी होत चालली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया या माध्यमांमुळे संवाद वाढल्यासारखा वाटतो पण प्रत्यक्षात माणसामाणसांतील संवाद कमी होत आहे.

आज अनेक वृद्ध व्यक्ती म्हणतात आम्हाला पैशांची गरज नाही, फक्त मुलांनी दोन प्रेमाचे शब्द बोलावेत. ही साधी अपेक्षा आहे; पण तीही अनेकदा पूर्ण होत नाही. वृद्धाश्रमांमध्ये अनेक आई-वडील दिवसभर आपल्या मुलांच्या फोनची वाट पाहत बसतात. सण-उत्सवांच्या दिवशी त्यांची वेदना अधिक तीव्र होते. कारण त्या दिवशी कुटुंबाची उब सर्वाधिक जाणवते. या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील कुटुंबव्यवस्थेचा विचार केला, तर काही मूल्ये शिकण्यासारखी वाटतात. वृद्धांना घरातील मानाचे स्थान देणे, त्यांच्या अनुभवाचा आदर करणे, कुटुंबातील निर्णयांमध्ये त्यांना सहभागी करून घेणे ही परंपरा अजूनही अनेक ठिकाणी टिकून आहे. ही गोष्ट केवळ एका धर्मापुरती मर्यादित नसून, ती मानवी मूल्यांची शिकवण आहे. परंतु त्याचवेळी हेही लक्षात घ्यायला हवे की वृद्धाश्रम ही संकल्पना पूर्णपणे नकारात्मक नाही. काही वृद्ध व्यक्ती स्वतःच्या इच्छेनेही वृद्धाश्रमात राहणे पसंत करतात. कारण तेथे त्यांना समान वयाच्या लोकांमध्ये राहण्याची संधी मिळते, आरोग्यसेवा मिळते आणि एकाकीपणाही कमी होतो. त्यामुळे वृद्धाश्रमांना पूर्णपणे दोष देणे योग्य नाही. पण जर कुटुंब असूनही आई-वडिलांना वृद्धाश्रमात राहावे लागत असेल, तर ते समाजासाठी नक्कीच चिंतेचे कारण आहे.

भारतीय समाजाच्या संस्कृतीचा पाया कुटुंबव्यवस्थेवर उभा आहे. कुटुंब म्हणजे केवळ रक्ताचे नाते नाही; ते प्रेम, जबाबदारी आणि परस्पर आदर यांचे जिवंत रूप आहे. जर कुटुंबातील नात्यांमध्येच दुरावा निर्माण झाला, तर समाजाच्या मूलभूत मूल्यांवरच प्रश्नचिन्ह उभे राहते. आज गरज आहे ती नव्या पिढीला योग्य संस्कार देण्याची. मुलांना लहानपणापासूनच आई-वडिलांचा आदर करणे, त्यांची सेवा करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे शिकवले पाहिजे. शाळा, समाज आणि माध्यमांनीही या विषयावर सकारात्मक संदेश द्यायला हवा. तसेच सरकार आणि समाजानेही वृद्धांच्या समस्यांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन आणि मानसिक आधार या गोष्टी मजबूत करणे गरजेचे आहे. वृद्धांचे आयुष्य सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगता आले पाहिजे.

खरं तर प्रत्येक माणसाचे आयुष्य एक पूर्ण वर्तुळ असते. आज जो तरुण आहे, तो उद्या वृद्ध होणार आहे. त्यामुळे आज आपण वृद्धांकडे कसे पाहतो, त्यावर उद्याच्या समाजाचे चित्र अवलंबून आहे. जर आपण आज आपल्या आई-वडिलांना सन्मान दिला, तर उद्या आपल्यालाही तोच सन्मान मिळेल. वृद्धाश्रमांची वाढ ही केवळ सामाजिक बदलाची खूण नाही; ती एक इशारा आहे, नात्यांची उब जपण्याचा. आपण आधुनिक होऊ, प्रगती करू; पण त्याचवेळी आपल्या संस्कृतीची मुळेही जपली पाहिजेत. कारण माणसाला खरे समाधान संपत्तीमध्ये नाही, तर नात्यांच्या उबेत मिळते. आई-वडिलांनी आयुष्यभर आपल्या मुलांसाठी स्वप्ने पाहिली, त्याग केला, संघर्ष केला. त्यांच्या वृद्धत्वात त्यांना फक्त एकच गोष्ट हवी असते आपुलकी. जर आपण ती देऊ शकलो, तर वृद्धाश्रमांची गरज कदाचित कमी होईल.

आज समाजाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की, आपण प्रगतीच्या शर्यतीत धावताना आपल्या आई-वडिलांना मागे तर सोडत नाही ना? जर या प्रश्नाचे उत्तर प्रामाणिकपणे शोधले, तर कदाचित आपल्या समाजाला नव्या दिशेचा मार्ग सापडेल. वृद्धांचा सन्मान हा केवळ संस्कृतीचा भाग नाही; तो माणुसकीचा पाया आहे. ज्या समाजात वृद्धांचा आदर केला जातो, तो समाज खऱ्या अर्थाने प्रगत मानला जातो. म्हणूनच आज गरज आहे ती नात्यांना पुन्हा जिवंत करण्याची, कुटुंबव्यवस्थेला बळ देण्याची आणि आई-वडिलांच्या प्रेमाचे ऋण कृतज्ञतेने फेडण्याची. कारण शेवटी सत्य एकच आहे, ज्या हातांनी आपल्याला चालायला शिकवले, त्या हातांना वृद्धत्वात आधार देणे आणि हेच खरे संस्कार आहेत.

**– प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.बा. ९९२३६२०९१९**

# कुर्ल्याच्या नववर्ष स्वागत यात्रेमध्ये यंदा 'स्वदेशी'चा जागर !




मुंबई - प्रतिवर्षी अभिनवसंकल्पना राबवून मुंबईकरांचे लक्ष वेधून घेणाऱ्या हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समिती, कुर्ला पश्चिमच्यानववर्षस्वागतयात्रेमध्ये यंदा 'स्वदेशी'चा जागर करण्यात येणार आहे. टाळ-मृदुंग, लेझिम पथक आणि ढोल ताशांच्या गजरात निघणाऱ्या या नववर्ष स्वागतयात्रेत कुर्लेकर पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार आहेत.

इंग्रज भारतातूनजाऊन ७८ वर्षांहून अधिक काळ उलटला तरी भारतीयांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव काही कमी झालेला नाही. हल्लीचे चित्रपट, वेब सिरीज, दूरचित्रवाहिन्यांवरील मालिका तसेच आजच्या पालकांचा आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याकडे वाढलेलाकल यांमुळे तो अधिक दृढ झाला आहे. भारतीय संस्कृतीने आज जगाला भुरळ घातली आहे, त्यामुळे ती जवळून पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी दरवर्षी लाखो पर्यटक भारतात येतात. आपण भारतीय मात्र दिवसागणिक आपल्याच संस्कृतीपासून दूर चाललो आहोत. स्वदेशी जीवनप्रणालीचेमहत्व आजच्या पिढीला उमजावे आणि त्यांच्या विचारांत आणि आचारात स्वदेशी संस्कृती भिनावी यासाठी समितीच्या वतीने यंदाच्या स्वागतयात्रेतचित्ररथ, जिवंत देखावे, फलक इत्यादी माध्यमांतूनस्वदेशी जीवनशैलीचे महत्वसांगण्यात येणार आहे.

विदेशी उत्पादनांचा वापर कमी करून स्वदेशी कंपन्यांची उत्पादने वापरण्याचे आवाहन स्वागतयात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. इंग्रजीचा अतिवापर टाळून मातृभाषेला प्राधान्य देण्याचे महत्व सांगितले जाणार आहे. भारतीय वातावरणाला अनुसरून पारंपारिक वेशभूषेचे महत्व पटवून दिले जाणार आहे. विदेशी खाद्याचे दुष्परिणाम आणि भारतीय खाद्यपदार्थांचे महत्व समजावून सांगितले जाणार आहे. भारतीय कला आणि दैनंदिन आचारधर्म जपण्याचे आवाहन स्वागतयात्रेतून करण्यात येणार आहे. पर्यटनासाठी विदेशी स्थळांना भेटी देण्याऐवजी भारतातील धार्मिक स्थळांना तसेच पुरातन संस्कृतीची आणि पराक्रमी इतिहासाची ओळख करून देणाऱ्या ठिकाणांना भेट देण्याचे आवाहनही स्वागतयात्रेच्या माध्यमातून नागरिकांना करण्यात येणार आहे. स्वधर्म, स्वभाषा, स्व-भूषा, स्व-खाद्य आणि स्व संस्कृतीचे महत्व समजून घेण्यासाठी अधिकाधिक नागरिकांनी या हिंदू नववर्ष स्वागतयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन नववर्ष स्वागतयात्रा समिती, कुर्ला पश्चिमच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९५२४४०००७० या भ्रमणभाष क्रमांकावर समर्क करण्याचे आवाहन समितीने केले आहे.




राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील काही शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे.

पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे.

उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते.


उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते.

डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही.

मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**













# ठाणे-मुलुंड दरम्यानच्या नवीन रेल्वे स्टेशनला धर्मवीर आनंद दिघेंचे नाव देण्याची शिवसेनेची मागणी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१८, ठाणे :** ठाणे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी ठाणे ते मुलुंड रेल्वे स्थानकादरम्यान नवीन स्थानक उभारण्यात येत आहे. या कामासाठी रेल्वे मंत्रालयाकडून २५० कोटींचा निधी देखील रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजूर केला आहे.

दरम्यान ठाणे आणि मुलुंड रेल्वे स्थानकाच्यादरम्यान उभारल्या जात असणार्या नवीन स्थानकासाठी २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे शिवसेनेचे संसदीय गटनेते खासदार श्रीकांत शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी केली होती. हा निधी अश्विनी वैष्णव यांनी मंजूर केला असून तो प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे गेल्याने लवकरच स्थानकाचे काम मार्गी लागणार आहे. आता या स्थानकाला ' धर्मवीर आनंद दिघे स्थानक ' असे नाव देण्याची मागणी सोमवारी संसदेत ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने केली. ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. या स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी ठाणे ते मुलुंड रेल्वे स्थानकादरम्यान नवीन स्थानक उभारण्यात येत आहे. काही काळापासून हे काम संथ गतीने सुरु होते. आता या कामासाठी २५० कोटींचा निधी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव मंजूर केला आहे. याबद्दल संसदेत खासदार नरेश म्हस्के यांनी अश्विनी वैष्णव यांचे ठाणेकरांच्या वतीने जाहीर आभार मानत या नवीन रेल्वे स्थानकाला धर्मवीर आनंद दिघे रेल्वे स्थानक नाव देण्याची मागणी केली. याच सोबत 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत ठाणे रेल्वे स्थानकाच्या मोठ्या दर्जाच्या अपग्रेडेशनचा प्रस्तावासाठी ९४९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षात आहे. तो प्रस्ताव मध्य रेल्वे विभागाने सादर केला आहे. मात्र तो रेल्वे बोर्डाकडे प्रलंबित आहे. तो त्वरित मंजूर करावा अशीही मागणी खासदार म्हस्के यांनी केली. तसेच ठाणे स्थानकावर गोरगरिब प्रवाशांसाठी 'इमर्जन्सी मेडिकल क्लिनिक' पुन्हा सुरू करावे, कोरोना काळात बंद केलेली ज्येष्ठ नागरिक सवलत त्वरित सुरू करावी, जुलैमध्ये वेलंकणी स्पेशल ट्रेन, मुंबई (दादर) आणि चिपळूण दरम्यानची 'नमो भारत' किंवा एसी ट्रेन आणि ठाणे ते कसारा, कर्जत आणि खोपोली दरम्यानची 'शटल लोकल' यांची वारंवारता वाढवावी. दुरांतो एक्सप्रेसना पनवेल, कल्याण, ठाणे किंवा दादर येथे 'कमर्शियल हॉल्ट' द्यावा तसच ठाणे स्थानकाला मुलुंडकडे जाणाऱ्या प्लॅटफॉर्म १, ७ आणि ८ ला जोडणाऱ्या एफओबी आणि प्लॅटफॉर्म ५, ६, ७, ८, ९ आणि १० वर एस्केलेटरची तातडीने आवश्यकता आहे, ते काम लवकर सुरु करावे, कळवा-ऐरोली एलिव्हेटेड लिंकचे काम जलद करावे आणि ठाणे स्थानकाचे प्लॅटफॉर्म सर्व गाड्यांसाठी १२ ते १५ कोच बसवण्यासाठी वाढवावेत; या आणि इतर अनेक मागण्या म्हस्के यांनी संसदेत केल्या.

# टाकळी ढोकेश्वर येथील बनाई देवी यात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात...

## यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रोउत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि.२१ मार्च ते २४ मार्च दरम्यान होणाऱ्या या यात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक, मनोरंजनाचे अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार, दिनांक २१ मार्च २०२६ रोजी फकीर शहावाली बाबांचा संदल कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात दारूगोळ्याची आतषबाजी करण्यात येणार आहे. तसेच परंपरेनुसार रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी बनाईदेवी यात्रेनिमित्त सकाळी ८.३० वा काठी मिरवणूक रात्री ७.३० वा. भव्य छबिना मिरवणूक आतिषबाजी आणि रात्री १० वा. नामवंत तमाशा कलावंत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला बनसोडे सह नितीन कुमार बनसोडे करवडीकर या मराठमोळ्या तमाशा कार्यक्रमाचे आयोजन केले असून सोमवार दि. २३ मार्च २०२६ रोजी मळगंगा देवीची सकाळी ८.३० वा. काठी मिरवणूक दुपारी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा, भरविण्यात येणार आहे.

रात्री ७.३० वा. भव्य छबिना पालखी मिरवणूक, रात्री १० वा. नामवंत लावणी कलाकार शबनम पुणेकर यांचा फुलवंती ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ रोजी मुक्ताई देवीची सकाळी ८ वा. काठी मिरवणूक मुक्ताई देवीच्या यात्रेनिमित्त सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

रात्री ८ वा. भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वा. रअमर पुणेकर प्रस्तुत नटखट सुंदरा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रमाने या ४ दिवसीय यात्रेची सांगता होते. या यात्रोउत्सवात दररोज भव्य मिरवणुकीसाठी मुख्य पारंपरिक पद्धतीने ढोल ताशा सनई पथक व ब्रास बँड खास आकर्षण असणार आहे. यात्रोत्सव असल्या कारणाने गावातील मुख्य प्रवेशद्वारावर तसेच संपूर्ण मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्याचे कामे अंतिम टप्प्यात आले आहेत.

परिसरातील भाविकांनी या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन बनाईदेवी यात्रा उत्सव कमेटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, प्रसिद्धी प्रमुख पत्रकार वसंत रांधवण, विवेक (सोन्या) धुमाळ, प्रशांत झावरे, अंकुश पायमोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रम झावरे, बांडे मामा, विकास आल्हाट व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### अतिरिक्त पोलीस बंदोबस्त

टाकळी ढोकेश्वर येथिल बनाई देवी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या विविध धार्मिक व इतर कार्यक्रमात पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या सूचनेनुसार यात्रोत्सवाकरीता अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. यात्रा उत्सव दरम्यान, हुल्लडबाजी करणाऱ्यांसह भुरट्या चोरांवर नजर ठेवण्याची सूचना पथकाला करण्यात आली आहे.